# नगर परिषद कार्यालय, यवतमाळ जि. यवतमाळ

आयएसओ ९००१ : २०१५ मानांकित कार्यालय

ईमेल:- npyavatmal@gmail.com

कार्यालय दूरध्वनी क्र. ०७२३२-२४४०३७, २४४२८५

जाक्र./बांध/३०५५/२०२५ | दिनांक ०३/११/२०२५

## जाहीर प्रकटन

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यामुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ७१/२०१३ ची सुनावणी दि.१३/१०/२०२५ रोजी संपन्न झाली असून सदर सुनावणी दरम्यान मा उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत, त्यानुसार नगरपरिषद क्षेत्रात रस्त्यांवरील खड्डयाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्डयामुळे मृत्युमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार यवतमाळ नगरपरिषद, यवतमाळ, जि. यवतमाळ हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अख्त्यारीत रस्त्यावरील खड्ड्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकाना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहित याचिका क्र.७१/२०१३ च्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण यवतमाळ | सदस्य |
| २. | मुख्याधिकारी | सदस्य |

तरी यवतमाळ नगरपरिषद, यवतमाळ जि. यवतमाळ हद्दीतील नगरपरिषद मालकीचे अख्त्यारीत रस्त्यावरील खड्ड्याबाबत यवतमाळ नगरपरिषद कार्यालयात तसेच npyavatmal@gmail.com या ई-मेल आयडी वर तक्रार दाखल करता येईल,

(शुभम क्यातमवार)

मुख्याधिकारी

नगर परिषद यवतमाळ